दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक), नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




मुंबई || वर्ष २ रे || अंक २३२ || बुधवार ०७ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## सतरा वर्षा आतील मूल व मुली यांची नाशिक येथे निवड चाचणी संपन्न..

दिनेश आंबेकर –

नाशिक : टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमानाने सतरा वर्षाच्या आतील मूल व मुली यांचे दिनांक ४ ऑगस्ट रोजी नाशिक येथे निवड चाचणी पार पडली,टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे सतरा वर्षाच्या आतील मूल व मुली यांचे राज्यस्तरीय सामने बारामती येथे २३,२४,२५ ऑगस्ट रोजी होणार आहेत. त्यानिमित्ताने नाशिक जिल्ह्यामधून दीडशे मुलांनी निवड चाचणी दिली, त्यामध्ये स्पिरिट क्रिकेट अकॅडमीच्या चार मुलांनी पण निवड चाचणी दिली, आराध्य सावंत सुधांशू ललवाणी, दुर्गेश खरोले, शिवराज भामरे,ह्या मुलांची नाशिक जिल्ह्याच्या टीम साठी निवड झालेली आहे. या सर्व मुलांना टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या सचिव मीनाक्षी गिरी यांचे मार्गदर्शन मिळालं ही निवड चाचणी घेण्यासाठी नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड व सहसचिव धनंजय लोखंडे नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे मेंबर व स्पिरिट क्रिकेट अकॅडमी चे सीनियर खेळाडू ओमकार पवार दर्शन थोरात हे उपस्थित होते, हे सर्व मुलं ऑलराऊंडर क्रिकेट खेळणारे आहेत. स्पिरिट क्रिकेट अकॅडमीच्या संचालिका नि सांगितलं की हे मुलं रोज दोन तास सराव करता ह्या मुलांची निवड झालेली आहे हे मुलं बारामती येथे खेळून, पुढे महाराष्ट्राच्या टीम साठी निवडली जाणार आहेत, यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे ,पुढील वाटचालीस मुलांना खूप खूप शुभेच्छा.



## जगासमोर पुन्हा महासाथीचा धोका! जागतिक आरोग्य संघटनेचा नेमका इशारा काय

पुणे : अनेक रोगांच्या साथीचे धोके परिचित आहेत. असे असले तरी या रोगास कारणीभूत ठरणारे विषाणू, जिवाणूंसह परजीवी घटकांचे उत्परावर्तन होत आहे. त्यामुळे त्यांच्यापासून निर्माण होणारा धोका वाढून महासाथ येण्याची शक्यता आहे, असा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. सर्वच देशांतील संशोधकांना भविष्यातील महासाथीला तोंड देण्यासाठी आतापासून उत्परावर्तित परजीवींचे संशोधन करण्यासाठी एकत्रितरित्या प्रयत्न करावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेची जागतिक महासाथ सज्जता परिषद नुकतीच ब्राझीलमधील रिओ दी जानेरोमध्ये झाली. या परिषदेवेळी कोॲलिशन फॉर एपिडेमिक प्रिपेअर्डनेस इनोव्हेशन्स (सीईपीआय) आणि जागतिक आरोग्य संघटनेने भविष्यातील महासाथीबाबतचा अहवाल जाहीर केला. या अहवालात म्हटले आहे, मानवी संसर्गास कारणीभूत ठरणाऱ्या परजीवींपासून निर्माण होणारा धोका ज्ञात आहे. मात्र ते उत्परावर्तित झाल्यास त्यांच्यापासून निर्माण होणारा धोका अद्याप समोर आलेला नाही. त्यामुळे अशा परजीवींवर संशोधन सुरू ठेवणे आवश्यक आहे. या परजीवींवर संशोधन करून भविष्यात त्यापासून मानवाला निर्माण होणारा धोका कमी करता येईल.



परजीवींमधील उत्परावर्तनावर बारकाईने लक्ष ठेवणे आणि संशोधन या दोन मुद्द्यांवर संघटनेने भर दिला आहे. संघटनेने म्हटले आहे की, परजीवी घटकांच्या संसर्गाचे माध्यम, मानवी संसर्ग आणि त्याचा मानवी प्रतिकारशक्तीवरील परिणाम या गोष्टी तपासणे आवश्यक आहे. परजीवींचे जास्तीत जास्त उत्परावर्तित प्रकार शोधल्यानंतर भविष्यातील त्यांच्या महासाथीपासून संरक्षणाचा उपायही शोधता येईल. जगातील अनेक देशांमध्ये परजीवींवरील संशोधनाची सुविधा नसल्याने तेथील उत्परावर्तित प्रकारांबाबत आपण अंधारात आहोत. यामुळे सर्वच देशांतील शास्त्रज्ञांनी यासाठी पुढाकार घेऊन एकत्रितरित्या प्रयत्न करायला हवेत.

पन्नास देशांतील दोनशे शास्त्रज्ञांचा सहभाग

या अहवालात ५० देशांतील २०० शास्त्रज्ञांचा सहभाग आहे. या शास्त्रज्ञांनी २८ विषाणू घराणी आणि बुरशीचा एक मुख्य समूह यांचे शास्त्रीय आणि पुराव्याच्या आधारे मूल्यमापन केले आहे. एकूण १ हजार ६५२ उत्परावर्तित प्रकार तपासण्यात आले. त्यानुसार या प्रकारांपासून साथ आणि महासाथ यापैकी कोणता धोका निर्माण होऊ शकतो, याबद्दल आडाखे बांधण्यात आले.

पुढील महासाथ येणार असून, ती कधी येणार असा केवळ प्रश्न आहे. भविषातील महासाथीला तोंड देण्यासाठी विज्ञान आणि राजकीय इच्छाशक्ती यांची गरज आहे. परजीवींच्या उत्परावर्तित प्रकारांबद्दल संशोधनासाठी सर्व देशांतील संशोधकांची मदत हवी आहे. – डॉ. टेडरॉस ॲडहोनम घेब्रेयेसिस, महासंचालक, जागतिक आरोग्य संघटना

## भारतीय हॉकी संघापुढे विश्वविजेत्या जर्मनीचे आव्हान ; अंतिम सामन्याचा निर्धार

पॅरिस : ऑलिम्पिक हॉकीत भारतीय पुरुष संघ ४४ वर्षांनंतर पुन्हा एकदा सुवर्ण जिंकण्यापासून दोन विजय दूर आहे. मंगळवारी पॅरिसमध्ये उपांत्य लढतीत भारतीय खेळाडू विश्वविजेत्या जर्मनीविरूद्ध भिडतील. हा अडथळा यशस्वीरीत्या पार करून संकटमोचक पी. आर. श्रीजेशला शानदार निरोप देण्यासाठी एक पाऊल पुढे टाकणार आहेत.

ब्रिटनविरुद्ध उपांत्यपूर्व लढतीत दहा खेळाडूंसह खेळणाऱ्या भारताने साहस आणि कौशल्याचे दर्शन घडवले. पेनल्टी शूटआउटपर्यंत हा थरार सांधिक कामगिरीच्या बळावर जिंकला. पण, या विजयाचा खरा नायक श्रीजेशच राहिला, टोकियोतही श्रीजेशने पेनल्टी थोपवून भारताला ४१ वर्षांनंतर कांस्य जिंकून दिले होते. काल शूटआउटमध्ये त्याने ब्रिटनचे दोन हल्ले यशस्वीपणे थोपविले होते. त्याआधी नियमित वेळेत प्रतिस्पर्धी संघाने भारतीय गोलफळीवर २८ वेळा हल्ले केले, शिवाय दहा पेनल्टी कॉर्नर प्राप्त केले. पण, त्यांना एकदाच यश मिळू शकले होते.उपांत्यपूर्व सामन्यात अर्जेंटिनाला हरविणाऱ्या जर्मनीचा सामना भारताविरुद्ध टोकियोत कांस्य पदकासाठी झाला. त्यावेळी भारताने त्यांना ५–४ असे नमविले होते. यंदा ऑलिम्पिकआधी भारताने जर्मनीविरुद्ध सहा सामने खेळले आणि पाच जिंकले. यंदा जूनमध्ये एफआयएच प्रो लीगमध्ये लंडन येथे भारताने जर्मनीचा ३–०ने पराभव केला. मात्र, परतीच्या सामन्यात २–३ असा पराभव पत्करावा लागला होता. आतापर्यंत ७ गोल नोंदविणारा कर्णधार हरमनप्रीतसिंग म्हणाला, उपांत्य सामन्यात अमितची उणीव जाणवेल. पण, आमचा फोकस सामन्यावर आहे. उपांत्यपूर्व सामन्यातही प्रत्येकाने अमितची उणीव भरून काढण्याचे प्रयत्न केले. कठीण प्रतिस्पर्धी असलेल्या जर्मनीविरुद्ध अखेरच्या क्षणापर्यंत कसे खेळायचे, या विषयी संघात चर्चा करण्यात आली. दुसरा उपांत्य सामना नेदरलॅन्ड्स वि. स्पेन असा रंगणार आहे. विश्व क्रमवारीवर नजर

टाकल्यास विश्व चॅम्पियन तसेच चारवेळा ऑलिम्पिक विजेत्या जर्मनी आणि भारतीय संघात फारसे अंतर नाही. जर्मनी चौथ्या, तर भारत पाचव्या स्थानावर आहे. ३६ वर्षाच्या श्रीजेशची ही अखेरची स्पर्धा आहे. सुवर्णासह त्याला निरोप देण्याची हीच संधी असेल.

भारताने हॉकीत आठ सुवर्ण पदके जिंकली, त्यातील अखेरवे सुवर्ण १९८०च्या मॉस्को ऑलिम्पिकचे होते.

उपांत्य लढत जिंकल्यास रौप्य पदक पक्के होईल. १९६०च्या रोम ऑलिम्पिकमध्ये भारताने शेवटचे रौप्य जिंकले होते.अमित रोहिदासवर एका सामन्याची बंदी

बचाव फळीतील महत्त्वाचा खेळाडू ३९ वर्षांचा अमित रोहिदास याच्यावर आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने एका सामन्याची बंदी घातली आहे. रविवारी ब्रिटनविरुद्ध झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात रोहिदासला रेड कार्ड दाखविण्यात आले. तो तब्बल ४० मिनिटे मैदानाबाहेर होता. मंगळवारी जर्मनीविरुद्ध होणाऱ्या उपांत्य सामन्यात तो खेळू शकणार नाही, एफआयएच आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल अमितला एका

सामन्यासाठी निलंबित करण्यात आले आहे. निलंबन सामना क्रमांक ३५ (भारताचा जर्मनी विरुद्धचा उपांत्य सामना) मध्ये लागू होईल, ज्यामध्ये अमित रोहिदास भाग घेणार नाही.

अपील फेटाळले

पेनल्टी कॉर्नर तज्ज्ञ आणि ड्रॅग फ्लिकर अमित रोहिदासच्या निलंबनाविरुद्ध दाखल केलेले हॉकी इंडियाचे अपील एफआयएचने फेटाळले आहे. यामुळे भारतीय संघात उपलब्ध असलेले १५ पैकी ११ खेळाडू जर्मनीविरुद्ध उपांत्य सामन्यात अंतिम संघात खेळू शकतील.

## कोकणासाठी आणखी २० गणपती स्पेशल मध्य रेल्वेकडून उद्यापासून आरक्षण सुरू

मुंबई : गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची गर्दी लक्षात घेऊन मध्य फेऱ्यांव्यतिरिक्त रेल्वेने २०२ आणखी २० अतिरिक्त फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या रेल्वे गाड्यांचे आरक्षण ७ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. या अतिरिक्त फेऱ्यांमध्ये लोकमान्य

टिळक टर्मिनस– रत्नागिरी द्वि–साप्ताहिक विशेषच्या ८ फेऱ्यांचा समावेश आहे. ही ०१०३१ विशेष गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ६, ७, १३, १४ सप्टेंबर या दिवशी ८ वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे दुसऱ्या दिवशी ४:५० वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे ०१०३२ विशेष गाडी रत्नागिरी येथून ७, ८, १४, १५ सप्टेंबर या दिवशी सकाळी ८:४० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे त्याच दिवशी ५:१५ वाजता पोहोचेल. ही गाडी ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड येथे थांबेल.

त्याचप्रमाणे पनवेल रत्नागिरी साप्ताहिक विशेषच्या ४ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. ही ०१४४३ विशेष गाडी पनवेल येथून ८ आणि १५ सप्टेंबर रोजी ४:४० वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे त्याच दिवशी ११.५० वाजता पोहोचेल. तसेच ०१४४४ विशेष गाडी रत्नागिरी येथून ७ आणि १४ सप्टेंबर रोजी ५:५० वाजता सुटून आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी १:३० वाजता पोहोचेल. या गाडीला पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड येथे थांबा देण्यात आला आहे.



१) पुणे – रत्नागिरी साप्ताहिक विशेषच्या ४ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत.

यामध्ये ०१४४७ विशेष गाडी पुणे येथून ७ आणि १४ सप्टेंबरला ००.२५ वाजता सुटून रत्नागिरीला सकाळी ११.५० वाजता पोहोचेल.

तसेच ०१४४८ विशेष गाडी रत्नागिरी येथून ८ आणि १५ सप्टेंबर रोजी ५:५० वाजता सुटून पुणे येथे दुसऱ्या दिवशी ५:०० वाजता पोहोचेल. ही ट्रेन चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड येथे थांबेल.

२) यामध्ये पनवेल रत्नागिरी साप्ताहिक विशेषच्या २ फेऱ्यांचा समावेश आहे. ०१४४१ विशेष गाडी २१ सप्टेंबर रोजी ४:४० वाजता पनवेल येथून सुटून रत्नागिरी येथे ११:५० वाजता पोहोचेल. तर ०१४४२ विशेष गाडी १० रोजी ५:५० वाजता रत्नागिरी येथून सुटेल आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी १:३० वाजता पोहोचेल.

३) पुणे – रत्नागिरी साप्ताहिक ३ विशेषच्या २ फेऱ्याही चालवण्यात येणार आहेत. यामध्ये ०१४४५ विशेष गाडी १० रोजी पुणे येथून ००:२५ वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे त्याच दिवशी ११.५० वाजता पोहोचेल.

## शेअर बाजारात कोलाहल, सेन्सेक्स पहिल्याच दिवशी २४०० अंकांनी कोसळला

मुंबई गेल्या काही दिवसांपासून शेअर बाजारातील चढ–उतारांमुळे चिंतेत सापडलेल्या गुंतवणूकदारांना आज आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर मार्केटनं मोठा धक्का दिला. सोमवारी मुंबई शेअर बाजारात व्यवहार सुरू होताच पहिल्या अर्ध्या तासात गुंतवणूकदारांना जवळपास १५ लाख कोटींचा फटका बसला. एकीकडे सेन्सेक्सनं तब्बल २४०० अंकांहून जास्त मोठी घसरण नोंदवली असतानाच दुसरीकडे निफ्टी ५० नंही सेन्सेक्सच्याच पावलावर पाऊल ठेवलं आणि गुंतवणूकदारांचे हजारो कोटी घटल्याचं दिसून आलं. त्यामुळे सोमवारची सकाळ गुंतवणूकदारांच्यां चिंतेत मोठी भर घालणारी ठरली.

स्मॉल व मिडकॅप शेअर्सचे दर घसरले

मुंबई शेअर बाजारासाठी सोमवारच्या व्यवहाराची सुरुवात धक्कादायक अशी राहिली. अमेरिकेत मंदी येण्याच्या शक्यता सध्या चर्चेत असून त्याचा परिणाम मुंबई शेअर बाजारावर झाल्याचं बोललं जात आहे. आज सकाळी व्यवहार सुरू झाले तेव्हा सेन्सेक्सची सुरुवातच निराशाजनक झाली. सुरुवातीच्या व्यवहारांमध्ये तब्बल २४०१.४९ अंकांनी खाली घसरून सेन्सेक्स ७८,५८०.४६ अंकांवर आला. यावेळी स्मॉल व मिडकॅप शेअर्सच्या किमतींमध्ये मोठी घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. पाठोपाठ निफ्टीनंही उलट्या दिशेनं प्रवास सुरू केला. सेन्सेक्स २४०० हून जास्त अंकांनी घसरल्यानंतर निफ्टीनं ४८९.६५ अंकांची घसरण नोंदवली. निफ्टी ५० चे व्यवहार सकाळच्या सत्रात २४,२२८.०५ अंकावर चालू होते.

१५ लाख कोटींचा फटका!

दरम्यान, मुंबई शेअर बाजारात आणि ५० च्या गटांगळ्यांमुळे गुंतवणूकदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. या मोठ्या घसरणीमुळे शेअर बाजाराचं एकूण मूल्य ४५७.१६ लाख कोटींवरून घसरून थेट ४४६.९२ लाख कोटींपर्यंत खाली आलं आहे. त्यामुळे एकूण मूल्य तब्बल १५ लाख २४ हजार कोटींनी घसरल्याचं दिसून आलं आहे.

मुंबई शेअर मार्केटमध्ये निर्माण झालेल्या या परिस्थितीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिस्थिती जबाबदार ठरल्याचं मानलं जात आहे. त्यामुळे रिॲलिटी क्षेत्र, आयटी, बँकिंग व आर्थिक सेवा क्षेत्र अशा अनेक क्षेत्रांना फटका बसला आहे.

संपादकीय

## ‘आयआयटी’

आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले नव्हते तोपर्यंत अभियांत्रिकीच्या तीन शाखांवर आपल्याकडे भर दिला जात असे. यांत्रिकी (मेकॅनिकल), विद्युत (इलेक्ट्रिकल) आणि स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी या तीन शाखांची विभागणीही गुणानुक्रमे होत असे. यापेक्षाही गुणवान ‘आयआयटी’त जात. त्याही काळात याद्वारे होणारी अभियंत्यांची निर्मिती पुरेशी नव्हतीच आणि होते त्यातील गुणवान परदेशी जाण्यात धन्यता मानत. ही अभियंत्यांची संख्या वाढवावी या वरकरणी आणि दिखाऊ हेतूने आणि स्वपक्षीय राजकारण्यांस धननिर्मितीचे सहज सोपे साधन निर्माण व्हावे या अंतस्थ आणि खऱ्या हेतूने तेव्हा खासगी अभियांत्रिकीची दुकाने आपण मोठ्या प्रमाणावर उघडली. एखादी नवी योजना हाती घेण्याआधी तिच्या अंमलबजावणीचा साकल्याने विचार आणि तशी तयारी न करण्याचा आपला ऐतिहासिक परिपाठ याबाबतही दिसून आला. या नव्या खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे ना आवश्यक साधनसामग्री होती ना प्रशिक्षित अध्यापक. त्यात या संस्थांचे चालक पडले राजकारणी. त्यामुळे कोणत्याही दर्जा निश्चितीखेरीज पिठाच्या चक्क्यांप्रमाणे ही अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली गेली. स्वपक्षीय राजकारण्यांस सुखावण्यासाठी वा अन्यपक्षीय राजकारणी आपल्याकडे यावेत यासाठी या महाविद्यालयांचा खिरापतीप्रमाणे वापर झाला. ही महाविद्यालयांची संख्या इतकी वाढली की ती जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक विद्यार्थीही आपणास मिळेनासे झाले. ही धोक्याची पहिली घंटा.

तीकडे दुर्लक्ष केल्याने परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडत गेली. ती आणखी रसातळाला नेण्यात महत्त्वाचा वाटा उचलला नव्याने उदयास आलेल्या संगणकीय विद्याशाखेने. त्यातही बाजारपेठी आकर्षणास बळी पडून घरोघरी आपल्या लेक/लेकीस ‘‘तू हार्डवेअरपेक्षा ‘सॉफ्टवेअर’ला जा’’ असे सल्ले मुबलक पालक देत. त्यामुळे अमूर्त अशा या विद्याशाखेत भरती होणारे वाढत गेले. त्यातील बहुसंख्य हे ‘संगणकीय टंकलेखक’ या दर्जाचे होते हे नाकारणे अवघड. यांचीही संख्या अखेर इतकी वाढली की बरकत असूनही सॉफ्टवेअर उद्याोगावर त्यांना दरवाजाबाहेर बाकांवरच बसवण्याची वेळ आली. मागणीपेक्षा पुरवठा अधिक झाला– आणि तोही कमअस्सल दर्जाचा– की यापेक्षा आणखी काय होणार? संगणक अभियंते वाढले म्हणून भारतीयांनी काही संगणकीय उत्पादनांची निर्मिती केली म्हणावे तर त्याबाबतही बोंब. या क्षेत्रातील जे गुणवान होते त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरला आणि गूगल, ॲपल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट आदी क्रियाशीलांची सेवा करण्यात धन्यता मानली. हे कमी म्हणून की काय या काळात एका नव्याच क्षेत्राचा उदय झाला.

ते म्हणजे सेवा क्षेत्र. कुणीतरी घरे बांधायची आणि इतरांनी ती सांभाळायची, घरात काही हवे–नको ते पाहायचे आणि लागेल तेव्हा हरकामास दाराशी सेवेस सादर व्हायचे म्हणजे ‘सर्व्हिस इंडस्ट्री’. कितीही उदात्तीकरणाचा प्रयत्न केला तरी सेवा क्षेत्र म्हणजे अखेरीस यापेक्षा अधिक काही नाही. इंटरनेट महाजालाच्या प्रसार– प्रभावामुळे दूरदेशीच्या आस्थापनांचे पगार काढणे, कर्मचारी व्यवस्थापन, दूरध्वनीवरून माहिती देणे इत्यादी उद्योग येथे बसून करण्याची सुविधा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याने आणि त्या प्रमाणात त्या क्षेत्रात रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने आपल्याकडे तरुणांच्या झुंडीच्या झुंडी त्या क्षेत्रात दाखल होऊ लागल्या. इतके दिवस अमेरिका, युरोप आदी विकसित देशांतील नोकरीच्या उच्चमध्यमवर्गीयांपुरत्याच उपलब्ध असलेल्या संधी या सेवा क्षेत्राच्या विस्ताराने बहुजन समाजातील तरुणांसही सहज मिळू लागल्या आणि पुणे, पार्ले, डोंबिवली आदी शहरांची मक्तेदारी पिंपरी–चिंचवड, परभणी आणि डिग्रस आदींनी मोडून काढली. यास जोड मिळाली ती वाढत्या वित्तीय (फायनान्स) आणि नंतर वित्त–तंत्र (फिनटेक) या क्षेत्रांची. कमी कष्टात अधिक पैसा कसा मिळवता येतो हे पहिल्याने दाखवून दिले आणि या दुसऱ्याने या वित्तक्षेत्रास सेवेची जोड दिली. अभियंते होऊन स्वत:स कष्टवण्यापेक्षा भांडवली बाजारात पैसे फिरवत अधिक नफा मिळवून देणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या या काळात अतोनात वाढली. परदेशी गुंतवणूकदारांस या काळात दोन पर्याय होते. चीन आणि भारत. यातील पहिला पर्याय निवडणाऱ्यांस चिनी राज्यकर्त्यांनी कारखानदारीत गुंतवणूक करणे भाग पाडले आणि दुसऱ्या पर्यायात भारतात फक्त पैसा आला. गुंतवणूक नाही.

# लायन्स् क्लब व लिओ क्लब चिपळूणचा दिमाखदार पदग्रहण सोहळा संपन्न

चिपळूण

(ओंकार रेळेकर) सन २०२४–२५ या वर्षासाठी लायन्स् क्लब चिपळूणच्या नुतन अध्यक्षाची सुत्रे संजीवनी प्रशिक्षण संस्था संचालित डि एम एल् टी नर्सिंग कॉलेजचे डिन लायन जगदीश वाघूळदे व लिओ क्लब चे नूतन अध्यक्ष लिओ प्रथमेश पोंक्षे यांनी दि ५ ऑगस्ट सोमवारी नामदेव शिंपी समाज मंदिर हॉल महालक्ष्मी नगर खेंड चिपळूण येथे संपन्न झालेल्या दिमाखदार सोहळयात स्विकारली.ङ्गलायन्स् व लिओ क्लब चिपळूण यांचा एकत्रित पदग्रहण शपथविधी सोहळा प्रांत ३२३४ ड १ चे प्रथम उप प्रांतपाल एमजेएफ ला डॉ विरेंद्र चिखले व रिजन ५ झोन २ च्या झोन चेअरमन ला प्रांजल गुंजवटे सह शपथ प्रधान अधिकारी लायन्स क्लब कुरूंदवाड चे ला अँड विजय जमदग्नी यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. ङ्गसन २०२४–२५ या लायनेस्टीक वर्षासाठी लायन जगदीश वाघूळदे व लिओ प्रथमेश पोंक्षे यांनी मावळते लायन्स अध्यक्ष ला नहुष चितळे व लिओ अध्यक्ष लिओ शाम परांजपे यांचेकडून अध्यक्ष पदाची सुत्रे स्विकारली लायन्स् सचिव ला राजीव कांबळे व लिओ सचिव लिओ डॉ रजत दाभोळकर तसंच लायन्स खजिनदार ला अरूण कदम व लिओ खजिनदार ला. कौस्तूभ अभ्यंकर सह संपूर्ण लायन्स् लिओ संचालक मंडळाने पद ग्रहण केले.ङ्ग प्रमुख पाहूणे प्रथम उप प्रांतपाल ला डॉ विरेंद्र चिखले यांनी लायनिझम चं महत्व सेवाकार्य यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे पौरोहित्य करणारे ला अँड विजय जमदग्नि यांनी लायन्स् व लिओ क्लब च्या संचालक मंडळास शपथ दिली व जबाबदारी व कर्तव्याची जाणीव करून दिली. २१७ देशांमधील १५ लाखा पेक्षा जास्त सदस्य संख्या असलेल्या जगातील सर्वात मोठ्या लायन्स् क्लब्ज इंटरनँशनल या एनजीओ मधे एक इंटरनँशनल अध्यक्ष व दुसरे लायन्स् क्लब अध्यक्ष ही दोनच पदं अत्यंत महत्वाची असून क्लब अध्यक्षांची धुरा लायन जगदीश व लिओ प्रथमेश यशस्वीपणे संभाळतील असा विश्वास व्यक्त केला लायन्स् नवीन सदस्य लायन ओंकार रेडीज व लिओ यश शेलार यांना नवीन सदस्य पदाची शपथ दिली समाजातील तळागाळातील उपेक्षित घटकांसाठी आपण सर्व लायन्स् परिवाराने आपला वेळ, बुध्दी व संपत्ति काही प्रमाणात खर्च करून गरजवंताच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करून त्यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस येण्यासाठी तुमचं योगदान महत्वाचे आहे असं आपल्या ओघवत्या शैलीत सांगुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. ङ्गलायन्स् नुतन अध्यक्ष ला जगदीश यांनी आपलं अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रांतपालांनी दिलेल्या अँक्शन प्लँन प्रमाणे नेहमीची दृष्टी प्रथम, आरोग्य, शैक्षणिक, स्वच्छता, ही सेवाकार्य करणारच आहे त्याच बरोबर दोन महत्वाचे परमंनंट प्रोजेक्ट म्हणजेच लायन्स् ची स्वमालकीची मोठी जागा खरेदी करणे व त्याठिकाणी लायन्स् इंटरनँशनल स्कूल सुरू करणार आहे त्याचबरोबर चिपळूण शहराच्या सुशोभीकरणासाठी प्रशासनाच्या सहकार्याने विशेष प्रयत्न करणार आहे. लायन्स् क्लब चिपळूण ला विविध सेवाकार्यासाठी नेहमी सहकार्य करणारे मंडळ अधिकारी श्री उमेश राजेशिर्के साहेब व चिपळूण नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी श्री मंगेश पेढांमकर साहेब यांना लायन्स् गौरव पुरस्कार देवून सम्मानित करण्यात आलं त्याच बरोबर पर्शुराम देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल ला जिवन रेळेकर व जेष्ठ लायन एमजेएफ श्रीनिवास परांजपे हे पीएमजेएफ झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला , ला अमर शेट्ये , ला वसंत उदेग, ला चंद्रकांत मांडवकर यांनी केलेल्या विशेष सेवाकार्याबद्दल इंटरनँशनल कडून आलेले सन्मान पत्र व मानाची पिन प्रमुख पाहूण्यांचे हस्ते देवून सम्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला माजी आमदार रमेशभाई कदम, सतिष खेडेकर, मिलिंद कापडी, आशिष खातू यांचे सह लायन्स् क्लब चिपळूण, लिओ क्लब, गँलक्सी, युनिटी, गुहागर, खेड, दापोली, सावर्डा, संगमेश्वर चे बहूसंख्य सदस्य व चिपळूण तालूक्यातील सर्व क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संखेने हजार होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ला अमर शेट्ये, श्रीनिवास परांजपे, मिलिंद मुद्राळे, राजकुमार जैन यांचे सह संपूर्ण लायन्स् व लिओ क्लब ने विषेश परिश्रम घेतले खुमासदार शैलित सुत्रसंचल ला राजकुमार व ला मिलिंद यांनी करून सभाग्रहाला मंत्रमुग्ध केले नूतन सचिव ला राजीव कांबळे यांनी आभार व्यक्त करून सुरूची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# श्रावणाचे आगमन प्रत्येक दिवसानुसार आहार आरोग्यवर्धक रानभाज्यांची जंत्री

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

दर्श अमावस्या रविवारी (ता.४) झाल्यावर सोमवार (ता.५) पासून श्रावण महिन्याची सुरुवात झाली आहे. श्रावण महिन्यात अनेक सणवार असतात. शिवाय पुष्कळ जण या महिन्यात मांसाहार करत नाहीत. जिल्ह्यातील रानावनात व रानमाळावर विविध रानभाज्या याच श्रावणात फुलतात. या विशेष हंगामात मिळणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांचे सेवन केल्याने आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. केवळ श्रावणात फुलणाऱ्या या वनस्पतींचे गुणधर्म औषधी असल्याने त्या आवर्जून खाल्ल्या जातात. शिवाय दिवसानुसार प्रत्येक भाजीला महत्व असून त्याप्रकारे त्या केल्या जातात. या रानभाज्या बाजारात उपलब्ध होत आहेत. आदिवासी महिलांना या रानभाज्या विकून चांगला रोजगार देखील मिळतो.

रानभाज्या आपोआप उगतात. कोणतही खत किंवा कीटकनाशक न वापरता पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने उगवलेल्या या रानभाज्या म्हणजे श्रावणातील आरोग्यदायी पर्वणीच असते. रानभाज्या या औषधी असतात, त्यामुळे पावसाळ्यात आरोग्य चांगले राहते. म्हणून श्रावणात जिल्ह्यात कृषी विभाग व समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून रानभाज्यांचे महोत्सव सुद्धा भरवले जातात

सण व आठवड्यात दिवसानुसार खाल्ल्या जाणाऱ्या रानभाज्या श्रावण सोमवारी कौला/कैलाच्या पानांची भाजी करतात. श्रावण शुक्रवारी जिवतीच्या फुलांची भाजी, श्रावण शनिवारी राजगिरा, कुर्डू, कुळी, टाकळा आणि आम्लीच्या पानांची एकत्रित



पंचभेळी भाजी करतात. ऋषीपंचमीला बऱ्याच रानभाज्यांची मिळून एक मिसळ भाजी करतात. भाज्या – देठी, देवभात, भारंगी, चाव्याचा बार/शेंडवेल, चिचार्डी, मेकी, पाथरी, कुर्डू, रानअळू. गौरी आणतात त्या दिवशी केनी व कुर्डूच्या पानांची भाजी– बैल पोळ्याला चवळीच्या पानांचे बेसन घालून मुठे करतात. वसुबारसेला गोवर्धन पूजा करताना सुरण, आळूकंद, करंदकंद आणि काशी कोहळा यांची भाजी करतात.

कपाळफोडी

कपाळफोडीच्या पानांची भाजी करतात. जीर्ण आमवातामध्ये पानांची भाजी खाण्याची प्रथा आहे. ही भाजी आमवात या संधिवाताच्या प्रकारात गुणकारी आहे. पोट गच्च होणे, मलाविरोध सारख्या विकारात कपाळफोडीच्या भाजीने आराम मिळतो. स्त्रियांची मासिक पाळी नियमित होत नसेल तर या भाजीचा चांगला उपयोग होतो.आधुनिक शास्त्रानुसार कपाळफोडीच्या पानात अँटिबायोटिक व अँटिपॅरासायटिक तत्त्वे असल्याने जुनाट खोकल्यावर कपाळफोडीची भाजी उपयुक्त आहे.

भारंग ही भाजी जिल्ह्यात मुबलक मिळत आहे. ही भाजी उगवल्यानंतर कोवळी असताना तोडली जाते. भारंगाची सुकी भाजी विशेष लोकप्रिय आहे. काहीजण वाल टाकून ही भाजी करतात.

कंटोली

कंटोली किंवा करटोली ही भाजी कारल्यासारखी दिसते. कारल्याची भाजी करतात तशीच या फळाची भाजी केली जाते. जिल्ह्यातील सर्व बाजारात आदिवासी महिला ही भाजी विक्रीसाठी घेऊन येत आहेत. मात्र भाव वधारले असून एक वाटा ५० रुपयांना आहे. कंटोलीला जून ते ऑगस्ट महिन्यात फुले व त्यानंतर फळे तयार होतात. कंटोली हे डोकेदुखी वर उत्तम औषध आहे. तसेच मधुमेहाच्या रुग्णांनी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर कमी होते.

कुरडूची भाजी

कुरडूची कोवळी पाने शिजवून त्याची भाजी करतात. दमेकरी जुनाट खोकला, वृद्ध माणसांचा कफ विकार यात ही भाजी उपयुक्त आहे.कुरडूची पालेभाजीसुद्धा लघवी साफ करायला उपयोगी आहे. या पालेभाजीमुळे कफ कमी होतो. जुनाट विकारात कुरडूच्या पालेभाजीचा रस सुद्धा पितात. कुरडूच्या बिया मूतखडा विकारात उपयुक्त आहेत.

कुलुची भाजी

फोडशी किंवा कुलु किंवा काल्ला या नावाने हि रानभाजी ओळखली जाते. हि भाजी म्हणजे एक प्रकारचे गवतच असते. हि भाजी फक्त पावसाळ्यातच मिळते. इतर पावसाळी भाज्यांप्रमाणे हि चविष्ट असते. हि भाजी शाकाहारी व मांसाहारी या दोन्ही प्रकारात करता येते.

काटेमाठ

काटेमाठच्या कोवळ्या भाज्या आणि कोवळ्या फांद्या भाजीसाठी वापरतात. पावसाळ्यात ओसाड जमिनीवर, रस्त्याच्या कडेला आणि शेतात काटेमाठ ही वनस्पती आढळते. ङ्गङ्गङ्गचुकाङ्ग चुक्याच्या पानांची, कोवळ्या फांद्यांची आणि खोडांची भाजी केली जाते. ओसाड जमिनीवर, बागेत आणि शेतात या वनस्पतीची वाढ होते. चुका ही भाजी अतिशय रुचकर असते त्यामुळे या भाजीला रोचनी नावाने सुद्धा ओळखले जाते. चुकाची भाजी आंबट–गोड असते.

आणखी विविध प्रकारच्या रानभाज्या रानभाज्या प्रकारांमध्ये अंबाडा, खरशिंग, दिंडा, लोथ, पेटा, भारंगी, अळू, तेरुली, फांगली, टाकळा, अग्निशिखा, रानतुळस, बांबू कोंब, रताळ्याचे कोंब, कवदर, कैला, टरली, कसविंदा , कुड्याच्या शेंगा अक्रोड अशा विविध प्रकारच्या रानभाज्यांचा समावेश होतो.

रानभाज्यांचे आहारातील महत्त्व खूप आहे. शासन व कृषी विभागाने त्यांच्या विक्रीस प्रोत्साहन द्यावे. रानभाज्यांना हमीभाव द्यावा. जास्तीजास्त रानभाज्या महोत्सव भरविण्यात यावा. यामध्ये आदिवासी व महिला गटांना सहभागी करून घ्यावे. ङ्गआदिवासी समाज कार्यकर्ते, सुधागड

# बहिणीची छेड काढल्याचा जाब विचारणाऱ्या भावाला बेदम मारहाण, नेरळ येथील घटना, नेरळ पोलीस ठाण्यात दामत गावातील चार जणांविरोधात गुन्हा दाखल,

रायगड जिल्हा
उत्तर प्रतिनिधी/ मंगेश यादव

नेरळ येथे सीएनजी पंपावर रिक्षात सीएनजी गॅस भरण्यासाठी एक तरुण गेला होता. तर रिक्षात असलेल्या आपल्या बहिणीला त्याने बाहेर उतरवले होते. मात्र ती तरुणी बाहेर उभी असताना त्याच पंपावर गॅस भरण्यासाठी आलेल्या इतर चार तरुणांनी तिची छेड काढली. हा प्रकार भावाला समजल्यावर त्याने त्या तरुणांना जाब विचारला असता त्यांनी त्या भावाला बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणानंतर संबंधित भावाने नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. दरम्यान तक्रार दाखल होताच तात्काळ आरोपीना नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर त्यातील एक आरोपी अल्पवयीन आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी आकाश प्रकाश पाटील हा तरुण रिक्षा चालवतो. दिनांक २ ऑगस्ट रोजी या आकाश हा नेरळला सीएनजी गॅस भरण्यासाठी आला होता. तसेच यावेळी त्याची बहीण देखील सोबत होती. सीएनजी गॅस पंपावर वाहनात गॅस भरताना वाहन निर्मनुष्य असावे लागते. त्यामुळे आकाशने बहिणीला बाहेर उतरवून तो गॅस भरण्यासाठी वाहनांच्या रांगेत रिक्षा घेऊन थांबला. त्याचवेळी तिथे स्विफ्ट गाडीतून दामत गावातील मुझमिल मलिक बुबेरे, फरान नासिर नजे, रियाज मो.बिलाल शेख यासह एक अल्पवयीन मुलगा हे सुद्धा दाखल झाले होते.

थोड्यावेळानंतर रिक्षात सीएनजी भरुन आकाश आल्यानंतर त्याला त्याची बहीण घाबरलेली दिसली. म्हणुन तिला काय झाले असे विचारले. तेव्हा आपण बाहेर थांबलो असताना स्वीफ्ट गाडीतुन चार जणांनी माझ्याकडे वाईट नजरेने पाहुन अश्लील इशारे केले असल्याचे तिने सांगितले. तेव्हा आकाशाला या गोष्टीचा राग येऊन त्याने तिथेच असलेल्या त्या चार जणांना याबाबत जाब विचारला. तेव्हा त्या चार जणांनी आकाशलाच हाताबुक्यानी बेदम मारहाण केली. तर त्यातील एका इसमाने त्याचे हातातील कड्याने आकाशच्या डोक्यात मारून डोक्यास गंभीर स्वरूपाची दुखापत करत पळ काढला. त्यामुळे जखमी झालेल्या आकाशने बहिणीसह नेरळ पोलीस ठाणे गाठत घडल्या प्रकारबाबत तक्रार दाखल केली. तर हा प्रकार बघता बघता संबंध परिसरात समजून नेरळ पोलीस ठाण्यात मोठा जमाव जमला.









नुकत्याच झालेल्या उरण येथील यशश्री शिंदे हत्येच्या पार्श्वभूमीवर जमलेले नागरिक आक्रमक झाले.

तर नेरळ पोलिसांनी याबाबत भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ७९, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करत तात्काळ आरोपीचा शोध सुरु केला. तर यानंतर मुझमिल मलिक बुबेरे, फरान नासिर नजे, रियाज मो.बिलाल शेख यांना पोलिसांनी अटक आज दिनांक ३ ऑगस्ट रोजी न्यायलयात हजर केले असता त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे हे अधिक तपास करीत आहेत.

# जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे औचित्य साधत योगदान फाउंडेशन ट्रस्ट च्या वतीने पक्ष्यांना खाद्य व निवारा मिळण्याकरिता वृक्षरोपण व कृत्रिम घरट्यांचे नियोजन

दै.सूर्योदय,कल्याण,(प्रतिनिधी): मानवाला आपल्या पुढच्या पिढ्यांना जगवायचं असेल तर शाश्वत विकासाच्या मार्गाशिवाय कोणताही पर्याय नाही. त्यासाठी निसर्ग आणि त्यातील प्रत्येक घटकाचं संवर्धन करणं ही अत्यावश्यक बाब बनली आहे.जागतिक निसर्ग संवर्धन दिन दरवर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जातो. हा दिवस निसर्ग आणि पर्यावरणाचे महत्त्व दर्शवतो. स्वच्छ पर्यावरण हा निरोगी आणि स्थिर मानवी समाजाचा पाया आहे हे मान्य करण्यासाठी या दिवशी जगभरात विशेष जनजागृती मोहिमेचे आयोजन केले जाते. जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश पृथ्वीवरील नैसर्गिक वातावरणातून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेले प्राणी आणि झाडे वाचवणे हा आहे. त्यामुळे निसर्गाचे रक्षण करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे.पृथ्वी वाचवण्यात संसाधनांच्या संवर्धनाची महत्त्वाची भूमिका आहे. पाणी, हवा, माती, ऊर्जा, खनिजे, वनस्पति, प्राणी, पक्षी अशा निसर्गाच्या अनेक अंगांचे जतन करून नैसर्गिक सौंदर्याचा समतोल राखता येतो. जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचेऔचित्य साधत योगदान फाउंडेशन ट्रस्ट च्या वतीने पक्ष्यांना खाद्य व निवारा मिळण्याकरिता वृक्षरोपण व वसाहतीकरण झालेल्या भागामध्ये कृत्रिम घरट्यांचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमात योगदान फाउंडेशन ट्रस्ट चे अध्यक्ष मदन मोहन चव्हान सभासद,सुनील शिंदे ,शैलेश गिरी , मनोज मोरया व गुंजल उपस्थित होते .यांनी पारस बाल भवन येथे भेट देऊन लहान मुलांना पक्षी संवर्धन व निसर्ग संवर्धन या विषयी मार्गदर्शन केले.२८ जुलै हा दिवस दरवर्षी जागतिक निसर्ग संवर्धन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मानवाने आपल्या सुख सोयीसोयींसाठी निसर्गाच्या केलेल्या शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याचा आजचा दिवस आहे. निसर्गाचे आपल्या परिने कसे संवर्धन करता येईल यासाठी एक पाऊल उचलणे, जनजागृती करण्याचे काम आजच्या दिवशी केले जाते. निसर्गाचे संवर्धन न केल्याने माणसांना ग्लोबल वॉर्मिंग, विविध आजार, वातावरणीय बदल, प्राकृतिक बदलांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आपल्या पुढच्या पिढीला चांगले आयुष्य हवे असल्यास आपल्या जवळ असलेल्या सुंदर निसर्गाचे संगोपन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



# वाहतूक कोंडी

गेल्याच आठवड्यात मुंबईतील सायन रेल्वे स्थानकावरील पूल बंद झाला आणि मुंबईकरांनी पुन्हा एकदा अभूतपूर्व वाहन कोंडी अनुभवली. हा त्रास आता तब्बल अडीच वर्षं मुंबईकरांना सहन करावा लागणार आहे, ही आणखी एक भयंकर गोष्ट आहे. मुंबई ही तिच्या समृद्ध वारशासाठी ओळखली जाते; आता ती सध्या बारमाही वाहतूक कोंडीने त्रस्त अशीही ओळखली जाऊ लागली आहे. मुंबई हे जगातील सर्वात वाईट रस्त्यांवरील रहदारीचे शहर आहे, ते पाचव्या क्रमांकाचे सर्वाधिक गर्दीचे शहर आहे. मुंबईतील वाहतुकीची स्थिती सातत्याने बिघडत चालली आहे. शहराचा गर्दीचा दर, प्रवासात घालवलेला सरासरी वेळ, बेसलाइन नॉन-कंजेस्टेड पातळीपेक्षा ५३ टक्के जास्त होता म्हणजे अर्ध्या मिनिटाच्या प्रवासाला गर्दीच्या वेळी २० मिनिटांपर्यंत जास्त वेळ लागतो. या वाहतूक कोंडीचे नागरिकांच्या वैयक्तिक आरोग्य आणि शहराच्या एकूण अर्थव्यवस्थेवर अनेक दीर्घकालीन प्रभाव पडत आहेत. वाहतूक कोंडीमुळे दिवसेंदिवस मुंबईचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे, हे यात सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

त्यात गेल्या सहा महिन्यांत वाहतूक कोंडीत १८ हजार वाहनांची भर पडली आहे. हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यांत शहरात गेल्या वर्षीच्या तुलनेत १८ हजार नव्या वाहनांची भर पडल्याने, मुंबईतील वाहतूक कोंडी आणखी वाढली आहे. मुंबईत सध्या ४८ लाख वाहने धावत आहेत. शहरात २ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत, त्यात २५% रस्त्यांची विविध कामे सुरू आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची आणखी भर पडली आहे. रिकव्हरमध्ये तर अक्षरशः तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. प्रवासासाठी लागणारा वेळ, इंधनावर होणारा खर्च त्यामुळे मनुष्याच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होत आहे.

मुंबईच्या वाहतुकीची समस्या निर्माण करणाऱ्या असंख्य घटकांपैकी एक म्हणजे शहराचा भूगोल हे आहे. नवी दिल्ली आणि इतर शहरांमध्ये त्रिज्यात्मक भूगोल आहे, त्यामुळे ते बाहेरून वाढतात आणि एका स्थानाला दुसऱ्या स्थानाला अनेक मार्गांनी जोडतात. दुसरीकडे मुंबई तिन्ही बाजूने अरबी समुद्राने वेढलेली आहे, ज्यामुळे तिची वाढ मर्यादित आहे. उत्तर आणि दक्षिणेला जोडणारे पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग या दोनच प्रमुख महामार्गांमुळे गर्दीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. आता त्यात भर पूर्व मुक्त मार्गाची व सागरीकिनारा मार्गाची म्हणजेच कोस्टल रोडची झालेली आहे. पूर्व मुक्त मार्गावर आता सकाळ व संध्याकाळी भयंकर वाहतूक कोंडी अनुभवास मिळते. तसेच कोस्टल रोड अजून अपूर्ण अवस्थेत असल्याने, सध्या पूर्ण असलेल्या रस्त्यांच्या सुरुवातीस व संपण्याचा ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. अशा प्रकारे सर्वच ठिकाणांवरून मुंबईची कोंडी होत आहे. याशिवाय मुंबईत ४.१ दशलक्ष वाहने रस्त्यावर आहेत, त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. मुंबईतील कारची घनता प्रतिकिलोमीटर ६०० कारपर्यंत वाढली आहे, जी भारतात सर्वाधिक आहे. मुंबईच्या उपनगरात तर फूटपाथवरील अतिक्रमण, त्यात अरुंद रस्ते त्यामुळे गर्दीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडी होते आणि शहर कोंडल्यासारखे होते. त्यात वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणत आहेत.

सार्वजनिक वाहतुकीच्या पर्यायांबद्दल शहराच्या उपनगरीय रेल्वेवर जास्त भार आहे. दररोज ७५ लाख लोक रेल्वेने प्रवास करतात. त्यानंतर सर्वाधिक प्रवासी म्हणजे ३५ ते ३६ लाख प्रवासी बेस्ट बसचा वापर करतात. बेस्ट ही आधीच तोट्यात असल्याने, सध्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी संघर्ष करत आहे, त्यात कमी होत जाणारा बसताफा. बसताफा वाढवण्यात येणाऱ्या अडचणी पाहता, असलेल्या बस गाड्या वाहतूक कोंडीत अडकल्या कारणाने वेळेवर येत नसल्याने व येणाऱ्या बस या गर्दीने तुडुंब भरल्या असल्याने लोकांना हा पर्यायदेखील गैरसोयीचा वाटतो, त्यामुळे साहजिकच लोकांचा कल हा खासगी वाहनांकडे आढळून येतो, त्यामुळे स्वतःचे वाहन घेणे याकडे लोकांचा ओढा जास्त आहे, त्यातच कोरोना नंतर स्वतःच्या वाहनाची गरज हा पर्याय लोकांना जास्त आवडू लागला आहे. तिसरा पर्याय शहरातील मेट्रोसेवा.

सुस्थापित मेट्रो नेटवर्कचा अभाव हे शहरातील वाहतूक कोंडीचे प्रमुख कारण आहे. सध्या मुंबई शहरात तीन मेट्रो सेवा सुरू आहेत व चौथी मेट्रो सेवा लवकरच सुरू होणार आहे. मेट्रोच्या सुरू असलेल्या बांधकामासाठी घेतलेल्या जागेमुळे शहरातील काही भागांमध्ये रस्त्यावरील मार्गांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीवर मर्यादा आल्या आहेत. मुंबईत आणखी नवीन पाच मेट्रो मार्ग सुरू होणार आहेत. मात्र ते सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल,

अशी आशा बाळगणे मूर्खपणाचे ठरेल, कारण सध्याच्या मार्गांवर मेट्रो सेवा सुरू आहे. तेथील वाहतुकीवर कोणताही फरक पडलेला नाही, उलट दिवसेंदिवस वाहतूक कोंडीही वाढत आहे. मुंबईत देशातील एकमेव मोनो मार्ग सुरू आहे; मात्र म्हणून तेथील मार्गाचा विचार करता व त्यावरील प्रवाशांची संख्या पाहता वाहतूक कोंडी कमी होईल, अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे ठरेल .

नवनवीन येणाऱ्या गाड्यांचे प्रकार, लोकांकडे खुळखुळणारा पैसा त्यामुळे कोणताही सारासार विचार न करता व अनेक गाड्या रोज रस्त्यावर येत आहे व गर्दीच्या वेळेस सर्वच रस्त्यांवर अभूतपूर्वक कोंडी पाहावयास मिळत आहे. या वाढत जाणाऱ्या वाहनांसाठी कोणतीही पार्किंगची सोय उपलब्ध नसल्याने, सर्रासपणे रस्त्यावर गाड्या उभ्या केल्या जात आहेत, त्यामुळे साहजिकच रस्त्यावरील मार्गिका या पार्किंगने अडवल्या जात आहेत

# जि.प.शाळा हर्णै नं १ शाळेत शिक्षण सप्ताह साजर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दि. २२ जुलै ते २८ जुलै २०२४ या काळात शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. या शिक्षण सप्ताहात दापोली तालुक्यातील जि. प.आदर्श जीवन शिक्षण विद्यामंदिर हर्णै नं. १ या शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अध्ययन- अध्यापन शैक्षणिक साहित्य निर्मिती दिवस साजरा करण्यात आला. दुसर्या सत्रात शाळेत शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. मुलभूत



संख्याज्ञान व साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी वाचन, पाठांतर, शब्दकोडी, भाषिक खेळ, गणिती क्रियांचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय यादिवशी सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक निपुण शपथ घेतली.क्रीडा दिवस करण्यात आला. दोरीउड्या, भोवरा फिरवणे, चमचा गोटी, आंधळी कोशिंबीर, संगीत खूर्ची, लगोरी, लंगडी, कबड्डी,फुगडी यांसारख्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

सांस्कृतिक कार्यक्रम दिवस अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी कवितागायन, भक्तिगीत गायन, प्रार्थना गायन केले. याशिवाय रेकॉर्ड डान्स, नाटीका,कथा, नाट्यछटा, नक्कलाही सादर केल्या. उपस्थित पालक व शिक्षणप्रेमींनी सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. श्रीम.सार्दळ मॅडम - विषय साधन व्यक्ती गटसाधन केंद्र दापोली यांनी सांस्कृतिक कार्यक्रमास कृतियुक्त सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मंगेश पाटील, जगदीश व गिरीश यांचे सहकार्य लाभले.

शाळेत वृक्षारोपण व इको क्लब उपक्रम साजरा झाला. या दिवशी शाळा ते हर्णै बायपासपर्यंत वृक्षदिंडी काढून रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपण करण्यात आले. तसेच शालेय परिसरात फुलझाडे लागवड करण्यात आली.वृक्षारोपण उपक्रमांतर्गत ही सर्व झाडे विद्यार्थ्यांस दत्तक देऊन त्यांचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आली.

शिक्षण सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी दि. २८ जुलै रोजी शाळेत शालेय पोषण दिवस , कौशल्य व डिजिटल प्रोग्राम दिवस साजरा करण्यात आला. संगणकाच्या मदतीने शैक्षणिक माहिती कशी मिळवावी, डिजिटल तंत्रज्ञानाचा कसा वापर करावा, उपयुक्त माहिती कशी जतन करावी, संगणकावर चित्र रेखाटन, रंगभरण कसे करावे याबाबतची एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याशिवाय टाकावू वस्तूंपासून पायपुसणी बनविणे, माडाच्या झावळीपासून झाप विणणे, झाडू बनविणे, पिशव्या शिवणे ,मातीच्या वस्तू बनवणे यांसारखी कौशल्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडून प्रत्यक्ष जाणून घेतली. याशिवाय याच दिवशी शाळेत समुदाय सहभाग दिवस - तिथीभोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सुधीर राणे,नितीन माने,मेघा सकपाळ , कोवळे उपस्थित होते.सप्ताहात साजरे झालेले सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेची दखल घेऊन शिक्षणप्रेमी सुभाष गोळे यांनी शाळेला रू.१००००/- ची (वस्तुरुप )देणगी देऊन कार्यक्रमास व शाळेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिक्षण सप्ताहाचे यशस्वी आयोजन व अंमलबजावणीसाठी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सुधीर राणे आणि सदस्य ,शाळेचे मुख्याध्यापक वरवडेकर मॅडम, सर्व शिक्षक वृंद आणि शालेय पोषण आहार ताईंनी विशेष परिश्रम घेतले.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय

बुधवार ०७ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## प्राथमिक शाळा पोफळी येथे पणती व नाग बनवणे स्पर्धा संपन्न

शनिवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी दीप अमावस्यानिमित्त इयत्ता १ ली ते ४ थीच्या चारही वर्गांमध्ये पणती बनवणे व नागाची प्रतिकृती बनवणे ही स्पर्धा घेण्यात आली.सर्व प्रथम दिव्यांचे पूजन



करण्यात आले.प्रशालेतील श्रेष्ठ शिक्षिका सौ.शिवानी शिंदे यांनी दीप अमावस्येची माहिती सांगितली.सौ.प्रतिभा धुमाळ यांनी गाणी म्हणवून घेतली.ङ्गनाग व पणती बनविणे या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःचे कौशल्य व विविध सजावटीच्या वस्तू वापरून आकर्षकरित्या शाडू माती आणि लाल माती यांपासून पणत्या आणि नागाच्या प्रतिकृती बनवल्या.या स्पर्धेमध्ये जवळजवळ सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या स्पर्धेसाठी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षिका सौ.शिवानी शिंदे,सौ.प्रतिभा धुमाळ,श्री.अशोक मिसाळ,सौ.साधना गायकवाड,सौ.मनिषा नाईक यांनी नियोजन केले. वर्ग शिक्षकांनी परीक्षण करून १ ते ३ क्रमांक आणि २ उत्तेजनार्थ असे क्रमांक काढले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात या दोन स्पर्धा पार पडल्या.

## श्रीवर्धन विभागाचे दुर्ग संवाद चर्चा सत्र पर्व २ रे संपन्न

श्रीवर्धन कोलमांडाले सोपान निंबरे; सह्याद्री प्रतिष्ठान श्रीवर्धन विभागामार्फत रायगड जिल्ह्यातील गडकिल्ल्यांचे दुर्ग संवर्धन कार्य करत आहे. या कार्याचा भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील किल्ले संवर्धन मोहिमा, बाणकोट किल्ल्याला प्रवेशद्वार लावणे, तोफेल तोफगाडा बसविणे अशी अनेक संवर्धनाच्या कामांसोबत सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे.दरवर्षी श्रीवर्धन तालुक्यातील दुर्गसेवक हे दुर्ग संवाद चर्चा सत्र घडवून आणतात यामध्ये संस्थे मार्फत वर्षभरात झालेला कामाचा आढावा घेतला जातो. तसेच जिल्ह्याच्या जवळील कोकणपट्ट्यात असलेलं संस्थेच्या दापोली, मंडणगड, खेड, उरण, पनवेल, मुंबई, वसई-विरार या विभागातील सदस्यांना आमंत्रित करून त्यांच्या कार्याला ही प्रोत्साहन दिले जाते. तालुक्यातील सामाजिक कार्यातील व्यक्तींचा सन्मान केला




जातो. तसेच या चर्चासत्र दिवशी जवळच्या किल्ल्यावर विशेष दुर्ग दर्शन मोहिमेचे आयोजन केले जाते.ङ्गया वर्षी हे दुसरे वर्ष असून दि.४ ऑगस्ट २०२४ रोजी हे सत्र माणगांव तालुक्यातील लोणारे येथील लाखपाले गावात फाळके निवास या ठिकाणी पार पडले. विभागीय चर्चा झाल्यानंतर इतर विभागातील प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये विशेष बाब म्हणजे संस्थेचे सदस्य दुर्ग अभ्यासक गणेश रघुविर यांनी दुर्ग निर्मिती, स्थापत्य, दुर्ग संवर्ध आणि दर्शन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. दीपेश सोगम यांनी छत्रपतींचे आरमार यावर थोडक्यात सार सांगितला. ललितेश यांनी रत्नागिरीमधील संवर्धन विषयावर भाष्य केले. खेडचे महेश जाधव व पनवेलचे अनंत वाझेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेचे बीडचे अशोक खेत्रे आणि डॉ पवन गिरी याची आपत्कालीन वैद्यकीय उपचार व काळजी कसे घ्यायचे यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीवर्धन विभाग प्रमुख योगेश निवाते यांनी केले. मनोज खोचर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर पन्हाळघर किल्ल्यावर दुर्ग दर्शनासोबत परम पवित्र भगवा ध्वजारोहण करण्यात आले. अजिंक्य कोलंबेकार,समीर फाळके,अमित भांबीड,प्रशांत सोगम,मयूर टकले,विल्सन रोड्रिक्स,जितेंद्र माने यांनी व्यवस्थापनेत सहकार्य केले.ङ्गदापोली,खेड,मुंबई,वसई विरार,पनवेल,उरण,श्रीवर्धन,शहापूर येथील विभाग प्रतिनिधी उपस्थित होते. अशी माहिती श्रीवर्धन विभागाचे अजिंक्य कोळंबेकर यांनी दिली.

## महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. – तहसिलदार श्री. श्रीधर गालिपेल्ली

मंडगणड (प्रतिनिधी): येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंडणगड तहसिलदार कार्यालय महसूल विभाग व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ‘महसूल पंधरवडा’ दिनानिमित्त ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ अंतर्गत नुकतेच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून मंडणगडचे तहसिलदार श्री. श्रीधर गालिपेल्ली व मंडल अधिकारी श्री. नीलेश गोडघासे हे उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल जाधव होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर, डॉ. भरतकुमार सोलापुरे,



डॉ. शैलेश भैसारे, ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप, तहसिलदार कार्यालयातील श्री. किरण चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.ङ्गकार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. राहुल जाधव यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी डॉ. शैलेश भैसारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तहसिलदार श्री.श्रीधर गालिपेल्ली यांनी सांगितले की, महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. तो शासन व जनतेमधील एक महत्वाचा दुवा असून तालुक्यातील नागरिकांमध्ये शासनाच्या विविध योजनांसंबंधी जागरुकता निर्माण व्हावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दींगत व्हावा यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविले जातात. महाराष्ट्र शासनाचा मध्यवर्ती विभाग म्हणून महसूल विभाग कार्यरत असून जमीन, महसूल, वसुली, कायदा व सुव्यवस्था राखणे आदी कामे महसूल विभाग करत असतो. महाराष्ट्र शासनाच्या सर्व योजना हया महसूल विभागामार्फत समाजामध्ये राबविल्या जातात. विकासात्मक प्रशासन द्यायची जबाबदारी महसूल विभागाची आहे. त्यामुळे लोकांच्या महसूल प्रशासनाकडून मोठया अपेक्षा असतात असे त्यांनी सांगितले. ङ्गयावेळी श्री. नीलेश गोडघासे यांनी ‘महसूल पंधरवडा’ निमित्त ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण’ या विषयी माहिती देताना १८ ते ३५ या वयोगटातील विद्यार्थी मुख्यमंत्री कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी पात्र असून त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विभागाच्या वेबसाईटवर आवडेल तो कोर्सकरिता आपले नाव नोंदणी करु शकतात. अशा प्रशिक्षित विद्यार्थ्यांना विद्यावेतन राज्य शासनाकडून दिले जाईल. अधिक माहितीसाठी त्यांनी तहसिल कार्यालयात किंवा राज्य सरकारची वेबसाईट पाहण्याचे आवाहन केले. ङ्गअध्यक्षिय समारोप करताना प्राचार्य डॉ. राहुल जाधव म्हणाले, की अशारितीने महाविद्यालयस्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करून महसूल विभागामार्फत दिल्या जाणा-या विविध योजनाविषयी विद्यार्थ्यांमार्फत समाजामध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. आज विविध दाखल्यांबाबत जनमाणसांत असणा-या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेक एजंट सर्वसामान्य लोकांची आर्थिक लूट करतात. हे टाळण्यासाठी महसूल विभागामार्फत अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागृती करणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी या माहितीचा उपयोग स्वतःबरोबर समाजासाठी करावा असे त्यांनी सांगितले. ङ्गकार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. शैलेश भैसारे यांनी मानले.

## रिपब्लिकन चळवळ गतिमान करण्यासाठी व जनतेच्या समस्यांचा तोडगा काढण्यासाठी राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या वतीने कार्यकर्ता संवाद यात्रेला युवा नेतृत्व बिपीनभाई कटारे यांच्या नेतृत्वाखाली आरंभ..

दै.सूर्योदय,मुंबई(प्रतिनिधी):- राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर नगर घाटकोपर मुंबई येथून राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या युवा आघाडीच्या वतीने युवा नेतृत्व बिपिन अण्णासाहेब कटारे यांच्या



नेतृत्वाखाली कार्यकर्ता संवाद यात्रेस प्रारंभ करण्यात आला.ङ्गराष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लिकन चळवळ गतिमान करण्यासाठी व जनतेच्या समस्यांचा तोडगा काढण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहे.ङ्गत्याच अनुषंगाने राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या युवा आघाडीच्या वतीने कार्यकर्ता संवाद कार्यक्रमच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

गाव- शहर-तालुका-जिल्हा पातळीवर राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष युवा आघाडी ही संवाद यात्रा घेऊन जाणार असून प्रत्येक युवा आघाडीचा पदाधिकारी कार्यकर्ता जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मैदानात उतरले आहेत. घाटकोपर मुंबईपासून या कार्यकर्ता संवाद यात्रेस प्रारंभ करण्यात आला असून ही संवाद यात्रा संपुर्ण महाराष्ट्रात जाऊन लोकांच्या समस्यांसाठी मैदानात उतरले आहे.यावेळी राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश जनसंपर्कप्रमुख सचिन भाऊ नांगरे, महाराष्ट्र प्रदेश युवा सदस्य हितेश भालेराव,ठाणे शहराध्यक्ष युवा आघाडी साईनाथ भाई खरात, ठाणे जिल्हा अध्यक्षा आरोग्य विभाग रंजनाताई भांगे, मुंबई प्रदेश सचिव विश्वासजी कांबळे, मुंबई नाका कामगार अध्यक्ष सागर भाऊ पिल्ले, दिवा शहराध्यक्ष युवा आघाडी रमेश जी तुपे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## नालासोपारा- विरार रहिवाशी पंचक्रोशी मंडळ- दाभोळआयोजित विध्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

दिपक मांडवकर

नालासोपारा- विरार रहिवाशी पंचक्रोशी मंडळ-दाभोळआयोजित विध्यार्थी गुणगौरव सोहळा रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी दुबे हॉल नालासोपारा पूर्व या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाची सुरवात शिवसेना लोकसभा समन्वयक श्री. नवीन दुबे साहेब आणि शिवसेना जिल्हा प्रमुख वसई विरार विधानसभा श्री. पंकज देशमुख साहेब यांच्या हस्ते दीप प्रज्वल

आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून सुरवात करण्यात आली आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्याचे मंडळाच्या तर्फे यांनी येतोचित सत्कार आणि स्वागत कारण्यात आले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना लोकसभा समन्वयक श्री. नवीनजी दुबे साहेब, शिवसेना जिल्हा प्रमुख पंकज देशमुख साहेब, विरार वसई महानगर पालिकेचे माजी आरोग्य सभापती श्री. नवनाथ शिंदे साहेब, शिवसेना विरार नालासोपारा विधानसभा सहसंघटक श्री. भरत



देवघरे साहेब, कर्जाय भैरी प्रतिष्ठान दाभोळ अध्यक्ष श्री. सुधाकर अडखले साहेब, आचोळे विभाग प्रमुख श्री. विनोद पार्टे साहेब, पत्रकार श्री. दीपक मांडवकर साहेब, गायक, निवेदक आणि निर्माता श्री. विजय नथुराम कर्जावकर यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी यांच्या हस्ते विध्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी श्री.नवीन दुबे साहेब यांच्या तर्फे छत्र्या देण्यात आल्या आणि श्री पंकज देशमुख साहेब यांच्या तर्फे वह्या देण्यात आल्या हॉटेल व्यवसायिक श्री. सचिन अडखले यांच्या तर्फे पेन आले. कार्यकामाचे सूत्रसंचालन मंडळाचे उपसचिव श्री. दिलीप चिविलकर यांनी केले प्रास्तविक पर भाषण मंडळाचे सचिव श्री अतुल वाडकर यांनी केले मंडळाचे उपाध्यक्ष श्री विनोद टक्के साहेब यांचे हि भाषण झाले शेवटी आलेल्या प्रमुख पाहुण्याचे आभार मानून मंडळाचे अध्यक्ष श्री संतोष अडखले यांनी आणि कार्यक्रम समाप्त झालं असं जाहीर केल. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. रमेश जाधव, श्री.मंगेश गोरीवले,सुभाष पेंढारी, विशाल अडखले, प्रभाकर वाडकर, रवींद्र पेंढारी,मुकेश पेंढारी, दिलीप नाडकर, महेश नाडकर, विनोद वाडकर, भरत नाडकर,प्रभाकर पेंढारी, संतोष पेंढारी, संतोष खापरे, सुनील गोठल, महेश अडखले, सुरेश गोठल, नितेश शिंदे, वैभव गोरीवले, संजय डांगे, शैलेश नाडकर, अंकुश पेंढारी, नितीन भुवड, सदाशिव वाडकर, दिनेश वाडकर, निकेश नाडकर, विनोद रेशीम, संजय रेशीम, रोहित शिंदे मंगेश अडखले यांच्या अथक परिश्रमानी सपन्न झाला

मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई - ४०००८१- अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )